सन २०२१-२२ या वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याकरीता संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनस्त सहसंचालक (मनपालेप ) स्था नि ले प या कार्यालयात कार्यरत गट-अ संवर्गातील उपंसचालक व सहाय्यक संचालक यांचे इष्टांक निश्चित करुन गुणांकनाच्या आधारे प्रतवारी ठरविण्याबाबत.

वाचा संदर्भ :

१. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: सीएफआर १२११/ प्र.क्र.२५७/तेरा ,दि.०२.०२.२०१७.
२. क्र. स्था नि ले प /१८/ब/ ले ल (व ) सह.(मनापालेप ) §कार्या.अह.१७-१८ इष्टांक निश्चित करणेबाबत /२११७ दि.०६/०८/२०१७
३. क्र.स्था.१८/ब कार्यामूल्यामापन अहवाल /सन २०१८-१९ /मनपालेप/६१२ दि.०५.०९.२०१८
४. क्र.स्था १८/ब/ २०१७-१८/ लले(व) सहसंचालक (मनपालेप) येथील सहा.सं. व उप.सं. सन २०१८-१९ कार्य.अहवालाचे इंष्टाक निश्चित करणेबाबात (सुधारित ) /५४ दि.१०.०९.२०१८
५. क्र.स्था१८/ब/२०१८-१९/ लले (व) /सहसंचालक (मनपालेप ) येथील सहा.सं व उप. सं. यांचे सन २०१९-२० कार्य. अहवालाचे इंष्टाक निश्चित करणेबाबत/६९ दि.१९.०६.२०१९
६. क्र.स्था/१८/ब/२०१९-२०/लले(व) सहसंचालक (मनपालेप) येथभ्ल सहा.सं. व उपसंचालक यांचे सन २०२०-२१ कार्य.अहवालाचे इष्टांक निश्चत करणेबाबत /६९

---

क्र. स्था १८/ब/२०१९-२० /लले(व) सहसंचालक (मनपालेप) येथील सहा.सं व उप. सं यांचे सन २०२०-२१ कार्य.अहवालाचे इंष्टाक निश्चित करणेबाबत / १७४७

संचालनालय स्थानिक निधी लेखापरीक्षा,
कोंकण भवन,सहावा मजला, ६१०,
सी बी डी बेलापूर,नवी मुंबई -४००६१४
दिनांक :२९.१२.२०२१

## -: परिपत्रक:-

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये सामान्य प्रशासन विभागाने सन २०१६-१७ पासून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील गट-अ अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे Mahapar या संगणक प्रणालीवर online पध्दतीने लिहावयचे योजिले आहे. त्याअनुषंगाने online कार्यमूल्यमापन लिहिण्यासाठी जो नमुना आहे. त्यानुसार संदर्भ क्रमांक २ अन्वये संचालनालयाने गट-अ संवर्गातील सहसंचालक (मनपालेप ) कार्यालयात कार्यरत सहाय्यक संचालक व उपसचालक(उपविभाग१ ,२ व उपविभाग-३ औरंगाबाद ) यांच्या कार्यपध्दतीबाबत इंष्टांक निश्चित करुन गुणांकनासाठी तीन भाग करण्यात आलेले आहेत.१ ) कार्यपूर्तता २ ) वैयक्तिक गुणवैशिष्टये ३ ) कार्यक्षमता व तद्नुसार सदर गुणाकंनाच्या आधारे प्रतवारी निश्चित करण्यात आलेली आहे.

**निकष :-** सहसंचालक (मनपालेप ) या कार्यालयात कार्यरत सहाय्यक संचालक व उपंसचालक ( उपविभाग १ ,२ व उपविभाग-३ औरंगाबाद ) यांचे सन २०२१-२२ या वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्यासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टये व उद्दिष्टयपूर्तीनंतर दयावयाचे गुणांकन निश्चित करण्यात येत आहे.

सहाय्यक संचालक ( मनापालेप ) २०२१-२२ या कार्यमूल्यमापन अहवालाकरिता खालीलप्रमाणे उद्दिष्टये व गुणांकन आहेत.

| अ.क्र. | उद्दिष्टये | गुणांकन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षा अहवाल निर्गमन | १० गुण | ०८ गुण | ०५ गुण | ०२ गुण |
| १ | महानगरपालिका लेखापरीक्षण चालू असताना प्रत्येक आठवडयामध्ये एक परिच्छेद MAINS प्रणालीवर अपलोड करणे | लेखापरीक्षण पथकाचे कामकाज प्रत्यक्ष चालू होण्यापूर्वी रेखांकन करणे ,आवाका काढणे,दप्तर नस्ती उपलब्ध करुन घेणे या बाबींवर पहिल्या महिन्याचे श्रमदिन खर्ची होत असल्याने प्रत्यक्ष लेखापरीक्षण चालू झाल्यापासून १५ दिवसात ०१ परिच्छेद MAINS प्रणालीवर अपलोड करणे | १६ ते २५ दिवस | २१ ते २५ दिवस | २६ ते ३० दिवस |
| २ | मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० १० मधील कलम (३)नुसार विहित कालावधीत प्रथम पुढील अभिप्राय कळविणे. | मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १० मधील कलम १९३० (३) नुसार०४ महिन्यांचा कालावधी संबंधित विभागास देणे आवश्यक असल्याने सदर कालावधी वगळून विहित कालावधीच्या १५ दिवसांत | २० दिवस | २५ दिवस | ३० दिवस |
| ३ | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमन | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल अंतिमीकरण झाल्यापासून ३० दिवसांचे आत | ४० दिवस | ५० दिवस | ६० दिवस |
| ४ | पुनर्विलोकनासाठी अहवालासाठी प्रस्तावित करण्यात येणारे परिच्छेद | सदर अहवालासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयीन नियम पुस्तिकेनुसार ७०७ प्रमाणपत्र देणे आवश्यक असल्याने अंतिमिकरण झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करणे | २० दिवस | २५ दिवस | ३० दिवस |

उपसंचालक ( मनापाले प ) सन २०२१-२२ या कार्यमूल्यमापन अहवालाकरिता खालीलप्रमाणे उद्दिष्टये व गुणांकन आहेत.

| अ.क्र. | उद्दिष्टये | गुणांकन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षा अहवाल निर्गमन | १० गुण | ०८ गुण | ०५ गुण | ०२ गुण |
| १ | मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम ( ३ ) १० मधील कलम १९३० नुसार विहित कालावधीत प्रथम पुढील अभिप्राय कळविणे | विहित कालावधीच्या १५ दिवस पूर्वी | विहित कालावधीच्या १० दिवसापूर्वी | विहित कालावधीत | विहित कालावधीत नंतर |
| २ | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल निर्गमन | महानगरपालिका लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमीकरण पूर्ण झाल्यापासून सरासरी ३० दिवसात | लेखापरीक्षण पूर्ण झाल्यापासून सरासरी ६१-७९ दिवसात | लेखापरीक्षण पूर्ण झाल्यापासून सरासरी ८०-९० दिवसात | लेखापरीक्षण पूर्ण झाल्यापासून सरासरी ९१ दिवस व त्यापेक्षा जास्त दिवस |
| ३ | **पुनर्विलोकन अहवालासाठी सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केलेले परिच्छेद अंतिम करुन सहसंचालक यांचेकडे पाठविणे** | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर १५ दिवसांमध्ये | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर १६ ते २० दिवसामध्ये | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर २१ ते २५ दिवसामध्ये | सहाय्यक संचालक यांनी प्रस्तावित केल्यानंतर २५ दिवसांपेक्षा अधिक |

उपरोक्त कोष्टकाचा वापर करुन कार्यपूर्तता अनुषंगे ४० गुण सरासरी रुपांतरीत करुन गुणांकन करावे.

टिप :-

१. महानगरपालिका लेखापरीक्षण शाखेतील सहाय्यक संचालक व उपसंचालक यांचे उद्दिष्टय पूर्तता याबाबत उद्दिष्टयनिहाय सविस्तर मासिक विवरण प्रतिवेदन अधिकारी (सहसंचालक म. न .पा.ले.प.) यांनी ठेवावे व व वर्षाअखेरीस अधिकारी निहाय अहवाल संचानालयास सादर करावा.

२. विभागीय सहसंचालक यांचे कामकाजाचे स्वरुप हे पर्यवेक्षीय मार्गदर्शक नियंत्रक स्वरुपाचे असल्याने क्षेत्रीय अधिका-यांना योजून देण्यात आलेली उद्दिष्टये विहित कालावधीत पूर्ण होतील हे पाहणे क्रमप्राप्त आहे. तद्नुसार उद्दिष्टयनिहाय सर्व जिल्हयांचे सरासरी कामाकाजावरुन सहसंचालक यांचे कार्यमूल्यांकन करण्यात येईल.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक : सीएफआर-१२११/प्र .क्र. २५७/तेरा,दि.०७.०२.२०१८ अन्वये सन २०१७-१८ पासून म वि व ले से संवर्गातील गट-ब सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी व लेखापरीक्षाअधिकारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे Mahapar संगणक प्रणालीव्दारे online लिहावयाचे आहेत. त्याअनुषंगाने सहसंचालक (मनपालेप ) यांनी कार्यालयातील लेखापरीक्षा अधिकारी व सहाय्यक लेखापरीक्षाअधिकारी यांचे सन २०२१-२२ या प्रवितदेन वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्यासाठीची उद्दीष्टये व उद्दिष्टयूर्तीनंतर दयावयाचे गुणांकन हे त्यांचे स्तरावर निश्चित करुन संबंधित अधिका-यांना व संचालनालयास अवगत करावे.

४. परिपत्रकाच्या अनुषंगाने संचालनालयास सादर करण्यात येणारा उद्दिष्टयनिहाय पूर्तता अहवालाची एक प्रत संचालनालयास पाठवून,सदर अहवाल महापार संगणक प्रणालीमध्ये स्वयंमूल्यनिर्धारण भाग-२ Online लिहिताना तिथेच PDF मध्ये Attached (Upload ) करण्यात यावा. व तसे स्वयंमूल्यनिर्धारण लिहिताना उद्दिष्टय पूर्तता अहवाल सोबत जोडले बाबतचे नमूद करावे. जेणेकरुन कार्यमूल्यमापन अहवाल प्रतिवदेन/पुनर्विलोकन करताना संबंधित प्रतिवेदन अधिकारी/ पुनर्विलोकन अधिकारी यांच्या निदर्शनास येईल.

सन २०१६-१७ पासून गट-अ अधिका-यांचे व सन २०१७-१८ पासून गट-ब अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल हे Mahapar संगणक प्रणालीव्दारे online स्वीकारण्यात येणार आहेत त्यामुळे online पध्दतीव्यतिरिक्त लिहण्यात येणारे कार्यमूल्यमापन अहवाल संचालनालयाच्य स्तरावर स्वीकारले जाणार नाहीत. यांची नोंद घेण्यात यावी.

सदर परिपत्रक संचालनालयाचे www.mahalfa.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(माधव नागरगोजे)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य

प्रत : सहसंचालक ( मन पा ले प ) यांना माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
(E-mail व्दारे )